# रशियन राज्यक्रांती आणि कारणे

Presented By
Dr.Vinayak Wasu
Dr.H.N.Sinha College,Patur

# रशियनराज्यक्रांति:

रशियातील झारची राजेशाही उलथून टाकणारी साम्यवादी क्रांती. रशियाप्रमाणेच जगाच्या राजकीय, आर्थिक व वैचारिक क्षेत्रांत फार मोठा प्रभाव पाडणारी ही क्रांती ७ नोव्हेंबर १९१७ रोजी घडून आली. रशियन दिनदर्शिकेप्रमाणे मात्र ही क्रांती २४ ऑक्टोबर १९१७ रोजी झाल्याने ती ऑक्टोबर राज्यक्रांती म्हणून ओळखली जाते. या क्रांतीमुळे रशियात सु. १४८० सालापासून चालत आलेल्या झारच्या राजेशाहीचा शेवट झाला आणि तेथे बोल्शेव्हिक कम्युनिस्टांची सत्ता स्थापन झाली. जगाच्या इतिहासात फ्रेंच राज्यक्रांतीइतकेच रशियन राज्यक्रांतीला महत्त्व आहे. या राज्यक्रांतीने वर्तमान जागतिक राजनीतीला अत्यंत संघर्षात्मक रूप दिले आहे.

रशियन राज्यक्रांतीला दीर्घकालीन पार्श्वभूमी आहे.⇨पीटर द ग्रेटच्या काळापासून (कार. १६८२–१७२५) रशियावर झार राजांची अनिर्बंध सत्ता होती. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत पश्चिम यूरोपात पारंपरिक राज्यव्यवस्थांना आव्हाने मिळत होती आणि या आव्हानांसमोर, त्या त्या देशातल्या एकतंत्री अन्याय्य सत्ता पराभूत होत होत्या मात्र रशियात झारची सत्ता टिकून होती

रशियन सैनिकांनी १८१२ मध्ये पहिल्या नेपोलियनची दमछाक केली. या लढायांच्या निमित्ताने हे सैनिक पश्चिम यूरोपचा प्रवास करून आले. त्यांना फ्रेंच राज्यक्रांतीतून उद्भवलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या कल्पनांचे आकर्षण वाटले आणि मग १८२५ च्या डिसेंबरात काही सैनिकांनीच रशियात संविधाननिष्ठ शासन सुरू व्हावे म्हणून उठाव केला. दुर्दैवाने तो उठाव फसला पण पुढील साठसत्तर वर्षांत वेगवेगळ्या चळवळी उद्भवल्या काहीजणांना आपला भूतकाळ अनुकरणीय वाटत होता. पारंपरिक कॉम्यून्स म्हणजे संघटित शेतीच्या प्रयोगशाळा टिकविल्या पाहिजेत व त्यातून पश्चिम यूरोपात उद्भवलेली भांडवलशाही टाळून मुक्त्त समाजाकडे झेप घेतली पाहिजे, ही विचारसरणी या मंडळींना प्रेरक वाटत होती. दुसरा गट आदर्श शासनमुक्त्त समाजव्यवस्थेचा पुरस्कार करीत होता. राज्य हे जुलमीच असायचे, सबब राज्यविहीन समाज उत्पन्न केला पाहिजे, हे स्वप्न या गटाला आकृष्ट करीत होते. तिसऱ्या गटाला पश्चिमी विचाराचे आकर्षण होते.

दुसरा गट आदर्श शासनमुक्त्त समाजव्यवस्थेचा पुरस्कार करीत होता. राज्य हे जुलमीच असायचे, सबब राज्यविहीन समाज उत्पन्न केला पाहिजे, हे स्वप्न या गटाला आकृष्ट करीत होते. तिसऱ्या गटाला पश्चिमी विचाराचे आकर्षण होते. पश्चिम यूरोपातल्या आधुनिकतेचा रशियाने स्वीकार करावा आणि तत्कालीन अगतिकता संपुष्टात आणावी, ही या गटाची भूमिका होती. चौथा गट दहशतवाद्यांचा किंवा अतिरेक्यांचा होता. हिंसक कृतींमधूनच राज्यकर्त्यांना धडा शिकवता येईल, ही या गटाची श्रद्धा होती. डिसेंबर १८२५ मध्ये झालेल्या पहिल्या उठावानंतर या निरनिराळ्या गटांनी देशातील असंतोष धगधगता ठेवण्याचे कार्य चालू ठेवले. १८५५ मध्ये सत्तेवर आलेल्या झार दुसऱ्या अलेक्झांडर बादशाहाचे काही सुधारणा अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. भूदास पद्धतीच्या जाचातून मुक्त्त झाला असल्याचा कायदा केला, स्थानिक स्तरावरती शासनात काही प्रमाणात लोकांचा सहभाग वाढेल  असे कायदे केले, शैक्षणिक सुधारणाही जाहीर केल्या. पण या सर्व सुधारणा

मार्क्सवादी पुढऱ्यांनी १८९८ मध्ये रशियन सोशल डेमॉक्रॅटिक लेबर पार्टीची स्थापना केली व रशियन भूमीवर मार्क्सप्रणीत मार्गाने क्रांती होईल हा विश्वास व्यक्त्त केला. ही क्रांती, अर्थातच शेतकऱ्याच्या नव्हे तर औद्योगिक कामगारांच्या नेतृत्वाखाली घडून येईल, ही क्रांती सरंजामशाहीचे व राजेशाहीचे केवळ भांडवलशाहीत परिवर्तन करून थांबणार नाही, तर समाजवादी परिवर्तनात परिणत होईल आणि मग जगातल्या इतर देशांचे कामगारही एकूण जागतिक क्रांतीचा डोंब उभा करतील वगैरे विचार सोशल डेमॉक्रॅटिक लेबर पार्टीने मांडण्यास प्रारंभ केला. याच पार्टीच्या १९०३ मध्ये झालेल्या दुसऱ्या अधिवेशनात बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक या नावाचे दोन गट निर्माण झाले.⇨ न्यिकलाय लेनिन या तरुण पुढाऱ्याने काही प्रश्नांबद्दल अधिक आग्रही भूमिका घेतली तर मार्तोव्ह नामक पुढाऱ्याने दुसऱ्या टोकाची मते मांडली. पक्षात दोन तट पडले. पक्षाच्या वतीने मुखपत्र चालविण्यासाठी मतदान झाले

दिनांक इ. स. १९१७

स्थान रशिया

परिणती

दुसरा निकोलाय ची सत्ता संपुष्टात


* रशियन साम्राज्य लयाला गेले
* बोल्शेव्हिकांच्या हातात सत्ता गेली
* रशियन यादवी युद्ध सुरू झाले



रशियन राज्यक्रांती ही पहिली साम्यवादी क्रांती होती. जगभरातील कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यास ती कारणीभूत ठरली. आर्थिक नियोजनाच्या मार्गाने विकास साधण्याची संकल्पना ही या क्रांतीने जगाला दिलेली देणगी आहे. इ.स. १९१७ च्या फेब्रुवारी महिन्यात पेट्रोग्राड येथे कामगारांनी संप पुकारला. ही रशियन राज्यक्रांतीची नांदी ठरली. त्यानंतर राजधानीतील सैनिकांनीही कामगारांना पाठिंबा दिला. हे या राज्यक्रांतीचे पहिले पर्व होते. स्वित्झर्लंडमध्ये अज्ञातवासात असलेला बोल्शेव्हिक नेता लेनिन इ.स. १९१७ च्या एप्रिलमध्ये रशियात परतला, तेंव्हा या राज्यक्रांतीचे दुसरे पर्व सुरू झाले

१९१७ रशियात झालेल्या राजकीय उलथापालथीस रशियन क्रांती म्हटले जाते. ... रशियन राज्यक्रांती ही पहिली साम्यवादी क्रांती होती. जगभरातील कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यास ती कारणीभूत ठरली. आर्थिक नियोजनाच्या मार्गाने विकास साधण्याची संकल्पना ही या क्रांतीने जगाला दिलेली देणगी आहे.

# शतक रशियन राज्यक्रांतीच




# रशियन राज्यक्रांतीची कारणे

१९ व्या शतकात युरोप खंडात राजकीय ,सामाजीक ,व आर्थिक स्वरुपाची स्थित्यंतर होत होती लोकशाही राज्य पद्धतीने अनेक युरोपीय देशात मुल धरले होते.अनेक देशामध्ये रस्त्रवादाचा प्रक्रियेत चालना मिळाली .मात्र या स्थित्यंतराचा काळात रशिया अलिप्त होता .रशियात अनेक वर्षापासून झार राजवट अस्तित्वात होती .या राजवटीत रशियन मोठ्या प्रमाणावर अन्याय होत होता .त्यातून १९१७ साली रशियन जनतेने राज्यक्रांती घडून आणली .याचे व्यापक परिणाम जागतिक राजकारणावर होऊन रशिया एक बलाढ्य शक्ती म्हणून समोर आला .

आर्थिक कारणे
राजकीय कारणे
रशियन जनतेची जमिनीची मागणी
रशियातील कामगार वर्ग
रशिया जपान युद्ध
1905 ची क्रांती
पहिल्या महायुद्धातील रशियन हानी
कार्ल मार्क्स चे तत्वज्ञान

व्लादिमिर
लेनिन
रशियाचे
क्रांतिकारी नेते
व विचारवंत



व्लादिमिर इलिच लेनिन (इस.१८७०-१९२४) हे रशियाचे क्रांतीकारी नेते व विचारवंत होते. यांचे मूळ नाव व्लादिमिर इलिच उल्यानोव्ह असे होते. सोवियत संघाच्या पहिल्या सरकारचे अध्यक्ष असलेले लेनिन सोवियत सोशॅलिस्ट बोल्शेव्हिक पार्टीचे (नंतरच्या सोव्हियेत कम्युनिस्ट पार्टीचे) नेते होते. रशियन राज्यक्रांतीनंतर इ.स १९१७ रोजी त्यांनी सत्ता हस्तगत केली. कम्युनिस्ट विचारसरणीत त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांचा मृतदेह रशियाच्या लाल चौकात जतन केला आहे. लेनिन हे कुशाग्र बुद्धिमत्तेचे साम्यवादी विचारवंत होते. त्यांचे कार्य जगाच्या इतिहासात खरोखरच अतुलनीय व नेत्रदीपक आहे.


THANK YOU